नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८६/२०१७
CNR No. - MHKO18-000615-2017

निशाणी १४ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून मिळणेसाठी केला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानूसार त्यानी जाणीवपुर्वक कैफियत देणेस उशीर केलेला नाही. त्यांचे वकील अपरिहार्य कारणाने कोर्टात हजर राहून कैफियत देवू शकले नाहीत. सबब त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून मिळणे विषयी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादी ने म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांचे म्हणणेनुसार अर्जात कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. कैफियत देणेसाठी ९० दिवसांची मुदत संपून गेली आहे. प्रतिवादींनी जाणून बुजून वेळेत कैफियत दिलेली नाही. सबब त्याने अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. उभय पक्षकारांतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीं हजर होवूनही कैफियत दिली नसल्याने त्यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश झाला आहे. प्रतिवादींना कैफियत देण्यासाठी ब–याच संधी दिल्याचे व दिनांक १९/१२/२०१७ रोजीचा निशाणी १३ कडील मुदतीचा अर्ज रुपये ५०/– कॉस्टसहीत नामंजूर झाल्याचे दिसून येते. ती कॉस्ट वादीने घेतल्याचेही दिसून येते. प्रस्तुत अर्जात दिलेले कारण जरी खरे मानले तरी

समाधानकारक नाही. तथापी न्यायाच्या दृष्टीने व दावेचे गुणदोषावर अंतिम निकालासाठी प्रस्तुतचा अर्ज कॉस्टसवर मंजूर करणे योग्य ठरते.

६. प्रस्तुतचा अर्ज जरी प्रतिवादींतर्फे दिला असला तरी अर्जासोबत कैफियतीवर फक्त प्रतिवादी नं. २ व ४ यांनीच सही केल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रीया संहीता क्रम ६ नियम १४ प्रमाणे कैफियतीवर प्रत्येक प्रतिवादींनी सही करणे आवश्यक आहे. तसे सही करण्यास एखादया कारणाने असमर्थ असेल तर त्याने नेमलेली अधिकृत व्यक्ती त्यावर सही करु शकते. प्रस्तुत कामी जरी प्रतिवादी नं. २ ने प्रतिवादी नं. १ व ३ करीता व स्वतः करीता कैफियतीवर सही केली असली तरी प्रतिवादी नं. १ व ३ यांनी त्याला वटमुखत्यारपत्र दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा स्थितीत ती कैफियत ( नि. १५) फक्त प्रतिवादी नं. २ व ४ यांचीच असल्याचे दिसून येते. म्हणून प्रस्तुतचा अर्ज फक्त प्रतिवादीं नं. २ व ४ यांच्यासाठीच कॉस्टसवर मंजूर करणे योग्य ठरते.

६. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे –

अ. प्रतिवादी नं. २ व ४ यांनी रक्कम रुपये २००/–( रु. दोनशे फक्त) कॉस्टस वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

ब. फक्त प्रतिवादी नं. २ व ४ यांचे विरुध्दचा विना कैफियत आदेश रद्द करणेत येतो.

सही/–

दिनांकः २६/०२/२०१८ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड